महाराष्ट्र शासन
पोलीस अधीक्षक, परभणी
दुरध्वनी क्रमांक (०२४५२) २२६२४४
E.Mail ID:sp.parbhani@mahapolice.gov.in पत्ताःपरभणी.४३१४०१.

जा.क्र.आस्था-१/२/आंजिब/स्विकृती (०९)/पोलीस शिपाई/२०२६ परभणी ,दिनांक १३.१०.२०२६

प्रति,

मा.पोलीस आयुक्त,बृहन्मुंबई
पोलीस अधीक्षक,रत्नागिरी/नांदेड/गडचिरोली

संदर्भ :-१.महाराष्ट्र पोलीस नियमावली-१९९, भाग-१ मधील नियम क्र.१६७(न)
२.महाराष्ट्र शासन, गृह विभाग, शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-१०१७/३८४३/प्र.क्र.-४३९/ पोल-५ ब, दि.२६/१०/२०१७.
३.आस्थापना मंडळाची बैठक दिनांक ०९.१०.२०२६

विषय :- आंतर जिल्हा बदली स्वीकृती बाबत.

*~*~*~*~*

उपरोक्त संदर्भ व विषयास अनुसरुन सादर करण्यात येते की, महाराष्ट्र राज्यातील इतर पोलीस घटकातुन परभणी पोलीस दलाच्या आस्थापनेवर प्राप्त झालेल्या प्रस्तावांची संदर्भातील शासन निर्णयातील अटी व शर्तीच्या अधिन राहुन परभणी जिल्हयाच्या आस्थापनेवर आस्थापना मंडळाची बैठक आयोजित करण्यात आली होती.

आस्थापना मंडळाने बैठकीत घेतलेल्या निर्णयानुसार या आस्थापनेवर प्राप्त आंतर जिल्हा बदली स्विकृती विनंती अर्जाच्या प्रतिक्षायादीतील जेष्ठतेनुसार तसेच प्रवर्गनिहाय उपलब्ध जागा असल्याने नमुद पोलीस अंमलदार यांना त्यांच्या कौटुंबिक/वैद्यकिय अडचणीस्तव नमुद अटी व शर्तीच्या अधीन राहुन आणि महाराष्ट्र शासन गृह विभाग शासन निर्णय क्रमांक-संकिर्ण-१०१७/३८४३/प्र.क्र.४६९/पोल-५ ब दिनांक २६.१०.२०१७ मधील तरतुदी नुसार उपरोक्त आंतर जिल्हा बदलीवर येणाऱ्या त्या जात प्रवर्गाच्या जागा रिक्त नसतिल, तरीही त्यांना बदलीवर स्विकारुन,भविष्यात निर्माण होणाऱ्या त्या प्रवर्गाच्या रिक्त पदामध्ये समायोजन करता येवु शकेल या अटीवर आंतर जिल्हा बदलीवर पोलीस शिपाई पदावर स्विकृती देण्यात येत आहे.

| अ.क्र | हुद्दा | बक्कल नं. | पोलीस अंमलदारांचे नाव | स्विकृती प्रवर्ग | सध्याच्या नियुक्तीचा घटक | स्विकृतीचे पद |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | पोशि | 1285 | .अमित शिवरत्न शिंदे | SC | रत्नागिरी | पोलीस शिपाई |
| 2 | पोशि | 110450 | बालु फुलाजी पवार | VJ-A | पो.आ.बृहन्मुंबई | पोलीस शिपाई |
| 3 | पोशि | 141797 | मुरलीधर शिवाजी मोरे | VJ-A | पो.आ.बृहन्मुंबई | पोलीस शिपाई |
| 4 | पोह | 1592 | पठाण इम्रान खान उमरदराज खान | OBC | नांदेड | पोलीस शिपाई |
| 5 | पोशि | 297 | गोविंद केशन भांगे | OPEN | नांदेड | पोलीस शिपाई |
| 6 | पोह | 1785 | मिलिंद मुंजाजी गवळी | OPEN | नांदेड | पोलीस शिपाई |
| 7 | पोह | 1767 | रामप्रसाद प्रकाशराव जाधव | OPEN | नांदेड | पोलीस शिपाई |
| 8 | पोशि | 5315 | मोसीन अमीनोद्दीन फारुकी | OPEN | गडचिरोली | पोलीस शिपाई |
| 9 | पोशि | 5293 | फयाज रज्जाक शेख | OPEN | गडचिरोली | पोलीस शिपाई |

२. उपरोक्त पोलीस अंमलदार यांना आवश्यक कागदपत्रे (नियुक्ती आदेश,संगणक प्रमाणपत्र,जातवैधता प्रमाणपत्र व स्थायित्व प्रमाणपत्र) आंतर जिल्हा बदलीवर हाजर होताना सादर करण्याच्या अटीवर स्विकृती देण्यात येत आहे. नमुद

कागदपत्रात उणीव असल्यास त्यांना आंतर जिल्हा बदलीवर हजर करुन न घेता त्यांना मुळ घटकात परत करण्यात येईल. याबाबतही संबंधित अंमलदार यांना अवगत करुन कार्यमुक्त करण्यात यावे.

३.वर नमुद पोलीस अंमलदार आंतरजिल्हा बदलीवर या घटकात हजर झाल्यानंतर त्यांची सेवाजेष्ठता ही शासन निर्णय दिनांक २६.१०.२०१७ मधील नियम ५ नुसार पोलीस शिपाई पदावरील भरतीची तारीख ग्राह्य धरण्यात येऊन, त्या तारखेच्या वर्षी, या घटकात पोलीस शिपाई पदावर भरती झालेल्या सर्वात कनिष्ठ असलेल्या शेवटच्या पोलीस शिपाई यांचे खाली निश्चित करण्यात येईल, तसेच या घटकात हजर झालेनंतर पोलीस मुख्यालयात नेमणूक दिली जाईल याबाबत संबंधीत पोलीस अंमलदारांकडुन **बंधपत्र/संमतीपत्र** घेऊन ते त्यांच्या सेवापटात डकविण्यात यावे.

४.वर नमुद पोलीस अंमलदार या घटकात रिक्त पदाचे उपलब्धतेनुसार त्यांच्या नावासमोर दर्शविलेलया पदावर बदलुन येण्यास तयार असल्यासच त्यांना कार्यमुक्त करावे. तसे त्यांच्याकडुन **संमतीपत्र** लिहुन घेऊन ते सेवापटात डकविण्यात यावे.

५.उपरोक्त नमुद पोलीस अंमलदारापैकी जे अंमलदार मागास प्रवर्गातील आहेत, अशा अंमलदारांची शासन निर्णय क्रमांक बीसीसी-२०१२/प्र.क्र.३३२/१२/१६-ब, दि.१८.०५.२०१३ नुसार त्यांच्या जात प्रवर्गाचे जातवैधता प्रमाणपत्र दिनांक ३०.०९.२०१३ पर्यत सादर करणेबाबत बंधनकारक केलेले असल्याने, त्या अनुषंगाने सदर अंमलदाराने त्याच्या जात प्रमाणपत्राची पडताळणी केल्याबाबतचे **जातवैधता प्रमाणपत्र** सादर केलेले असावे.

६.वर नमुद पोलीस अंमलदार हे सद्यस्थितीत कोणत्याही प्रकारची **मोठी शिक्षा भोगत नासावेत** व त्यांच्या विरुध्द कोणत्याही प्रकारचे न्यायालयीन प्रकरण अथवा प्राथमिक/विभागीय चौकशी प्रलंबित अथवा चालू नसावी. सदर बाब निदर्शनास आल्यास संबंधीत पोलीस अंमलदार यांना या घटकात हजर करुन न घेता परत पाठविण्यात येईल. **ज्या पोलीस अंमलदाराचे विरुध्द कोणत्याही प्रकारचे न्यायालयीन प्रकरण अथवा प्राथमिक/विभागीय चौकशी प्रलंबित, प्रस्तावीत अथवा चालू आहे अशा पोलीस अंमलदारास कार्यमुक्त करण्यात येवु नये.**

७.वर नमुद अंमलदार हे दिर्घ मुदतीच्या रजेवर म्हणजे (अर्जित/रुग्ण/प्रसुती इ.) असतील तर अशा अंमलदारांना ते रजेवरुन कर्तव्यावर हजर झालेनंतर कार्यमुक्त करण्यात यावे. तसेच अशा अंमलदारांची माहिती या कार्यालयास कळविण्यात यावी.

८.पोलीस अंमलदार यांना कार्यमुक्त करताना त्यांना सेवेत स्थायी केले बाबतचे स्थायीत्व प्रमाणपत्र/आदेशाची प्रत कार्यमुक्त आदेशासोबत जोडावी.

९.पोलीस अंमलदार यांना कार्यमुक्त करताना त्यांची पोलीस शिपाई पदी भरती/निवड करण्यात आलेल्या आदेशाची साक्षांकीत प्रत कार्यमुक्त आदेशासोबत जोडावी.

१०. नमुद पोलीस अंमलदार हजर झाल्यानंतर ०५ वर्ष मोटार परिवहन विभागात काम करणे बंधनकारक राहिल असे हमीपत्र घेवुन मगच कार्यमुक्त करावे.

११. नमुद पोलीस अंमलदार हे **एक महिन्याचे आत** या आस्थापनेवर हजर झाले नाही तर ते या आस्थापनेवर हजर होण्यास इच्छुक नाही असे गृहीत धरुन त्यांची आंतरजिल्हा बदलीबाबतची विनंती अमान्य करुन त्यांचे जागी प्रतिक्षा यादीतील दुसऱ्या पोलीस अंमलदारांना आंतर जिल्हा बदलीवर येण्यास स्विकृती देण्यात येईल.

वर नमुद पोलीस अंमलदार हे उपरोक्त अ.क्र.०१ ते ११ अटीची पुर्तता करीत असतील/मान्य करीत असतील तर त्यांना आंतरजिल्हा बदलीवर या घटकात हजर होण्यासाठी दिनांक २५.१०.२०२६ पुर्वी कार्यमुक्त करण्यात यावे, ही विनंती.

पंकज कुमावत ( भा.पो.से )
पोलीस अधीक्षक,परभणी